**मा. पंतप्रधानांनी स्वातंत्र दिनी जाहीर केलेल्या पाणी पुरवठा विषयक विविध कार्यक्रमांची अंमलबजावणी राज्यामध्ये करण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग**
**शासन निर्णय क्र.ग्रापापु १००३/प्र.क्र.२१० /पापु-०७**
**मंत्रालय,मुंबई ४०० ०३२, दिनांक - १४ ऑक्टोबर,२००३.**

**वाचा :-** केंद्र शासनाच्या ग्रामीण विकास मंत्रालयातील पाणी पुरवठा विभागाचे इंग्रजी पत्र क्रमांक डब्ल्यू.११०११/४/२००२-टि.एम.-III दिनांक २२ जुलै २००३.

**प्रस्तावना :-**

सन २००२ च्या उन्हाळयात देशातील विविध भागामधील पिण्याच्या पाण्याची भीषण टंचाई लक्षात घेऊन देशातील १८ टंचाईग्रस्त राज्यातील पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सोडविण्यासाठी, पाणी टंचाई असलेल्या भागामध्ये **१ लाख हातपंपाची** उभारणी करणे, ग्रामीण भागातील **१ लाख प्राथमिक शाळांमध्ये** पिण्याच्या पाण्याची सोय उपलब्ध करुन देणे आणि पिण्याच्या पाण्याच्या **१ लाख पारंपारिक स्त्रोतांचे पुनरुज्जीवन** करणे या तीन कार्यक्रमांची घोषणा मा.पंतप्रधानांनी स्वातंत्र दिनानिमित्त, दिनांक १५ ऑगस्ट, २००२ रोजी राष्ट्रास उद्देशून केलेल्या भाषणामध्ये केली होती.

२. मा.पंतप्रधानांनी घोषित केलेल्या या कार्यक्रमांची माहिती व अंमलबजावणीसाठीच्या मार्गदर्शक सूचना केंद्र शासनाने त्यांच्या संदर्भिय दिनांक २२ जुलै,२००३ च्या पत्रान्वये निर्गमित केल्या आहेत. मा. पंतप्रधानांनी स्वातंत्रदिनी जाहीर केलेल्या या कार्यक्रमाची अंमलबजावणी राज्यामध्ये सुरु करण्याची व त्यासाठी सविस्तर मार्गदर्शक सूचना देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

प्रस्तावनेत नमूद केलेल्या बाबीचा विचार करून मा. पंतप्रधानांनी स्वातंत्रदिनानिमित्त राष्ट्रास उद्देशून केलेल्या भाषणात घोषित केलेले पुढील तीन कार्यक्रम **सन २००३-२००४ व २००४-२००५** या आर्थिक वर्षात **राज्यामध्ये राबविण्यास शासन मंजूरी देत आहे :-**

**१) पाणी टंचाई असलेल्या भागामध्ये हातपंप उभारणे.**
**२) पिण्याच्या पाण्याच्या पारंपारिक स्त्रोतांचे पुनरुज्जीवन करणे.**
**३) ग्रामीण भागातील प्राथमिक शाळांमध्ये पिण्याच्या पाण्याची सोय उपलब्ध करुन देणे.**

२. हा कार्यक्रम राबविण्यासाठी केंद्र शासनाने राज्यास दिलेले उद्दिष्ट व योजनेचा प्रति युनिट खर्च पुढील प्रमाणे आहे :-

| अ. क्र | कार्यक्रम | केंद्र शासनाने राज्यास ठरवून दिलेले उद्दिष्ट | केंद्र शासनाने ठरवून दिलेला एका युनिटचा कमाल खर्च रु. |
|---|---|---|---|
| १ | हातपंप उभारणी | ५९२५ | ३४,७५० |
| २ | पिण्याच्या पाण्याच्या पारंपारिक स्त्रोतांचे पुनरुज्जीवन करणे | ५९२५ | १५,२५० |
| ३ | ग्रामीण भागातील प्राथमिक शाळांमध्ये पिण्याच्या पाण्याची सुविधा उपलब्ध करणे. | ३७३० | ३०,००० |

३. या कार्यक्रमांच्या अंमलबजावणीसाठी राज्यास ठरवून दिलेले उद्दिष्ट २००३-०४ व २००४-०५ या आर्थिक वर्षात पूर्ण करावयाचे आहे. केंद्र शासनाने राज्यास ठरवून दिलेले उद्दिष्ट या **शासन निर्णया सोबतच्या विवरणपत्रात नमूद केल्यानुसार संबंधित जिल्हयांना ठरवून देण्यात येत असून ते विहित वेळेत पूर्ण करण्यात यावे.** एखाद्या जिल्हयातील टंचाईची तीव्र

परिस्थिती लक्षात घेऊन, त्या जिल्हयास ठरवून दिलेल्या उद्दिष्टा पेक्षा मोठया प्रमाणात कार्यक्रम राबविण्याची संबंधित जिल्हा परिषदेची व संबंधित ग्राम पंचायतींची तयारी असेल तर, अशा जिल्हयाच्या जिल्हा परिषदांनी तसा सविस्तर प्रस्ताव तात्काळ शासनाकडे पाठवावा.

४. **हातपंपउभारणी व पारंपारिक स्त्रोतांचे बळकटीकरण करणे या उपाययोजना राबविण्यासाठी मार्गदर्शक सूचना :-**

(अ) **गावे / वाडया निवडीचे निकष व प्राथम्यक्रम :-**

(१) जिल्हयातील ज्या गावांना/वाडयांना पिण्याच्या पाण्याची टंचाई जाणवण्याची शक्यता असल्याने टंचाई कार्यकमांतर्गत विंधण विहिर घेण्याची मागणी आली असेल अशी गावे/ वाडया .

(२) एन.सी. / पी.सी. गावे / वाडया.

(ब) **लोकसहभाग :-**

ही योजना लोकसहभागामधून राबवावयाची असल्याने, हातपंप व स्त्रोत बळकटीकरण या दोन्ही **योजनेच्या भांडवली खर्चाच्या १० % भाग संबंधित योजनेच्या लाभार्थ्यांनी उचलणे आवश्यक आहे.** योजनेत अनुसूचित जाती /अनुसूचित जमातीच्या लाभार्थ्यांची संख्या ५०% पेक्षा अधिक असेल तर, **त्या योजनेसाठी लोकसहभागाची रक्कम ५% राहील.** या दोन्ही योजना टंचाई भागासाठी असल्याने विशेष बाब म्हणून संबंधित लाभार्थी जर ही लोकसहभागाची रक्कम पूर्णतः भरू शकत नसतील तर, लोकसहभागाची रक्कम संबंधित ग्राम पंचायतीने स्वतःच्या उत्पनातून भरावी. संबंधित ग्राम पंचायतीचीही आर्थिक स्थिती तूर्त चांगली नसल्यास लोकसहभागाची ही रक्कम मा. खासदार अथवा आमदार यांच्या स्थानिक विकास निधीमधून भरण्यास या योजनेपुरती हरकत नाही. योजनेचा प्रस्ताव संबंधित ग्रामपंचायतीने मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांच्याकडे सादर करण्यापूर्वी लोकसहभागाची रक्कम स्वतंत्र बँक खात्यात जमा करणे आवश्यक आहे. केंद्र शासन उर्वरित ९०% रक्कम उपलब्ध करून देणार आहे.

(क) **कार्यक्रम राबविण्यासाठी मार्गदर्शक सूचना :**

(१) ज्या ग्रामपंचायतीमधील गावात / वाडीत या कार्यक्रमाअंतर्गत योजना घ्यावयाची आहे तेथून तशी **मागणी** संबंधित गाव / वाडी ज्या ग्रामपंचायत क्षेत्रात अंतर्भूत आहे, त्या **ग्रामपंचायती कडून** प्राप्त होणे आवश्यक आहे. ही मागणी संबंधित ग्रामपंचायतीने **ग्रामसभेत ठराव घेवून करावी.**

(२) ग्राम पंचायतीने हा ठराव **जिल्हा परिषदेकडे** पाठवावा.

(३) वरील प्रमाणे प्रस्ताव जिल्हापरिषदेकडे सादर करताना ग्रामसभेने खालील बाबींवर ठराव करणे / कार्यवाही करणे आवश्यक राहील **:**

(अ) योजनेची अंमलबजावणी करण्यासाठी, मुंबई ग्रामपंचायत (दुसरी सुधारणा) अधिनियम, २००३ नुसार सुधारित कलम ४९ अन्वये **ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समिती** गठित केलेली असावी अथवा करण्यात यावी.

(ब) योजनेच्या **अंमलबजावणी**ची कामे, ग्रामसभेने निवडलेली ग्रामपंचायतीची वरील (अ) मध्ये नमूद **ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समिती** करेल.

(क) योजनेच्या अंमलबजावणीसाठी **ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समितीचे नावे वेगळे बँक खाते** उघडून ते खाते चालविण्याचे अधिकार ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समितीच्या किमान दोन पदाधिका-यांना ग्रामसभेने द्यावेत.( यापूर्वीच ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समितीच्या नावे असे स्वतंत्र बँक खाते **राष्ट्रीयीकृत बँकेत** अथवा **सहकारी बँकेत** उघडण्यात आले असल्यास ते पुन्हा उघडण्याची आवश्यकता नाही.) या योजनेसाठी प्राप्त होणारी / **लोकवर्गणीची** लोकांकडून वसूल करण्यात आलेली रक्कम वरील प्रमाणे उघडण्यात आलेल्या **बँक खात्यात** जमा करण्याचे अधिकार **ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समितीला** देऊन ती रक्कम या स्वतंत्र बँक खात्यात जमा करण्यात यावी. जर, ग्रामपंचायतीच्या स्वतःच्या उत्पन्नातून

वा निधीतून ही रक्कम भरली जाणार असल्यास, ग्रामसभेत तसा ठराव करुन ही रक्कम ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समितीच्या नावे उघडलेल्या स्वतंत्र खात्यात जमा करावी. आमदार/खासदार निधीतून ही रक्कम उपलब्ध झाली असेल तर ती सुध्दा या स्वतंत्र खात्यात जमा करावी. अशा त-हेने या योजनेसाठी लोकवर्गणीची रक्कम स्वतंत्र बँक खात्यात जमा केल्याबाबतचा पुरावा प्रस्तावासोबत सादर करावा.

(४) अशा त-हेने वर नमूद केलेले ठराव व आवश्यक कागदपत्रासह प्रस्ताव ग्रामपचायतीच्या ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समितीने **जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिका-यांना सादर करावा.**

(५) जिल्हापरिषदेने त्यांच्याकडे ग्रामीण पाणी पुरवठा व स्वच्छता समितीकडून प्राप्त झालेल्या प्रस्तावांचे नोंदणी रजिस्टर ठेवावे. ते सर्व ग्रामपंचायतीस व जनतेस तपासणीसाठी खुले असावे.

(६) शक्यतो हातपंप उभारणी व पारंपारिक स्त्रोतांचे बळकटीकरण करणे या उपाययोजना एकत्रितरित्या राबविण्यात याव्यात. म्हणजे ज्या गावात या योजनेअंतर्गत हातपंप उभारणी करण्यात येणार आहे, त्याच गावातील पिण्याच्या पाण्याचे स्त्रोत पुनरुज्जिवीत व पुनःर्भरीत करण्यात यावेत. जर दोन्ही बाबींची एकाच गावास गरज नाही याची खात्री झाल्यास व गावाकडून तशी स्वतंत्र मागणी आल्यास पुढील परिच्छेदात नमूद केलेल्या जिल्हा मंजूरी समितीने सर्व बाबींचा विचार करुन, परंतु दोन्ही मागण्या आलेल्या गावांना प्राधान्य देऊन, उपाययोजना मंजूर करण्याचा निर्णय घ्यावा.

(७) ग्रामसभेच्या ठरावानुसार संबंधित ग्रामपंचायतीकडून आलेला प्रस्ताव तपासून त्यास **प्रशासकीय, तांत्रिक व वित्तीय** मंजूरी देण्यासाठी जिल्हास्तरावर पुढील प्रमाणे समिती गठीत करण्यात यावी :-

| | | |
|---|---|---|
| १ | मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद | अध्यक्ष |
| २ | जिल्हा पाणी पुरवठा अधिकारी | सदस्य |
| ३ | उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत), जिल्हा परिषद | सदस्य |
| ४ | कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद | सदस्य |
| ५ | शिक्षण अधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद | सदस्य |
| ६ | महिला व बाल विकास अधिकारी, जिल्हा परिषद | सदस्य |
| ७ | या कामात तंज्ञ असलेल्या सेवाभावी संस्थेचा समितीने नियुक्त केलेला प्रतिनिधी | सदस्य |
| ८ | कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे विभाग, जिल्हा परिषद | सदस्य |
| ९ | जिल्हा वरिष्ठ भूवैज्ञानिक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा | सदस्य-सचिव |

ग्राम पंचायतीकडून प्राप्त झालेल्या प्रस्तावांची तपासणी करुन प्रस्तावास **प्रशासकीय, तांत्रिक, प्रक्रिया परिपूर्ती** व **वित्तीय** मंजूरी देण्याबाबतची कार्यवाही या समितीने करावी. या समितीने एकदा योजनेस मंजूरी दिल्यावर पुन्हा वरील नमूद कोणत्याही मंजूरीची आवश्यकता राहणार नाही.

(८) मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या अध्यक्षतेखालील समितीने विंधण विहिरीच्या प्रस्तावास अशा प्रकारे प्रशासकीय, तांत्रिक व वित्तीय मंजूरी देताना राज्यात ६० मीटर खोलीची विंधण विहिर खोदून त्यावर हातपंप उभारणीसाठी सध्या येत असलेल्या प्रमाणित खर्चाच्या ९०% रक्कम व पुनरुज्जीवन करण्यासाठी केंद्र शासनाने मंजूर केलेल्या सरासरी खर्चाच्या ९०% रक्कम मंजूर करावी. **रक्कमेच्या ५०% रक्कम संबंधित ग्रामपंचायतीच्या ग्राम पाणी पुरवठा समितीच्या स्वतंत्र बँक खात्यात जमा करुन त्या गावास विहित पध्दतीचा अवलंब करुन सदर उपाययोजनेचे काम सुरु करण्यास सांगण्यात यावे.** योजनेसाठी गावाने जमा केलेली १०% लोकवर्गणीची रक्कम व ग्राम पाणी पुरवठा समितीच्या खात्यावर जिल्हा परिषदेने उपरोक्त प्रमाणे जमा केलेली रक्कम, या रकमांपैकी एकुण ६०% खर्च झाल्यानंतर खर्चाच्या, ग्रामस्तरावरील सामाजिक लेखा परिक्षण समितीच्या प्रमाणपत्रासह संबंधित गावाच्या ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समितीने निधीचा पुढील हप्ता मिळण्यासाठी मुख्य कार्यकारी अधिकरी, जिल्हा परिषद यांच्याकडे अर्ज करावा.

(९) योजना पूर्ण झाल्यानंतर संपूर्ण खर्चाचे विनियोग प्रमाणपत्र ग्रामस्तरावरील सामाजिक लेखा परिक्षण समितीच्या प्रमाणपत्रासह संबंधित ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समितीने जिल्हा परिषदेस सादर करावे.

(१०) विंधण विहिरीची खोली ही सर्व साधारणपणे ६० मीटरपेक्षा जास्त असून नये. एखाद्या ठिकाणच्या भौगोलिक व भूशास्त्रीय परिस्थितीनुसार एखादया प्रकरणी ६० मीटरपेक्षा जास्त खोलीची विंधण विहिर घेण्याची आवश्यकता आहे असे तेथे सर्वेक्षण करणा-या भूवैज्ञानिकाचे अथवा शासनाने मान्य केलेल्या पॅनेलवरील खाजगी तंत्रज्ञाचे मत झाल्यास तसा अहवाल व प्रमाणपत्र ग्रामपंचायतीने ग्रामसभेत ठराव घेऊन मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या अध्यक्षतेखालील समितीकडे पाठवून त्यांची मंजूरी मिळाल्यानंतरच ६० मीटरपेक्षा जास्त खोलीची विंधण विहिर खोदण्यात यावी. त्यावेळेस ६० मिटर्सपेक्षा अधिकच्या खोलीसाठी लागणारा खर्चही (केंद्र शासनाने ठरवून दिलेल्या प्रतीयूनिट कमाल खर्चाच्या मर्यादेच्या अधिन राहून) मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या अध्यक्षतेखालील समितीने मंजूर करावा. ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समितीने केलेल्या कामाच्या गुणवत्तेबाबतची तपासणी मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या अध्यक्षतेखालील समितीने ठरविल्याप्रमाणे जिल्हा परिषदेमधील अथवा भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणेच्या संबंधित अभियंत्यांने वेळोवेळी करावी.

(११) या कार्यक्रमातंर्गत मंजूर करण्यात आलेली विंधण विहिर टंचाई आराखड्यात अंतर्भूत असेल तर, ती विंधण विहिर पुन्हा टंचाई निवारण कार्यक्रमाअंतर्गत मंजूर होणार नाही याची दक्षता घ्यावी. म्हणजेच, एखाद्या गावात / वाडीत विंधण विहिर घ्यावयाची झाल्यास, मा.पंतप्रधानांनी घोषित केलेला कार्यक्रम अथवा टंचाई निवारण कार्यक्रम यापैकी एकाच कार्यक्रमामधून ती विंधण विहिर घेण्यात यावी.

(१२) योजना मंजूर झाल्याचे पत्र ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समितीला प्राप्त झाल्यानंतर, ग्रामपंचायतीना, ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समितीच्या मार्फत पाणी पुरवठा सुविधांची कामे स्वतः मजूर लावून, तांत्रिक कामे खुल्या व पारदर्शक पध्दतीने कंत्राटदार लावून अथवा संचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा / जिल्हा परिषद यांनी ठरविलेल्या कमाल दराच्या अधीन राहून, शासकीय रिग अथवा खाजगी रिग भाडेतत्वावर लावून, सुटे भाग वरील प्रमाणेच उपलब्ध करुन घेऊन करून घेता येतील. मात्र, याचा सर्व हिशोब, कागदपत्रे, इत्यादी बाबी ग्रामपंचायतीत जतन करुन ठेवण्याची व ती तपासणीसाठी सामाजिक लेखा परिक्षण समितीस, महिला विकास समितीस, जिल्हा मंजूरी समितीस, त्यातील सदस्यांना, लेखा परिक्षकास, राज्य शासन व केंद्र शासनाच्या अधिका-यांना उपलब्ध करुन देण्याची जबाबदारी ग्रामपंचायतीच्या ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समितीची राहील.

(१३) आवश्यकतेनुसार मंजूर आराखडे व प्राकलनांनुसार **निविदा कागदपत्रे तयार करणे, निविदा/ जाहिरात देणे, आलेल्या देकारांची छाननी करणे, मालाची खरेदी, रिग भाडेतत्वाने लावणे इ. सर्व** कामे ग्रामपंचायतीच्या **ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समितीने** करावयाची आहेत. यासाठी आवश्यक तांत्रिक सहकार्य जिल्हापरिषदेच्या ग्रामीण पाणी पुरवठा विभागाच्या / उप विभागाच्या / यांत्रिक उप विभागाच्या तांत्रिक अधिका-यांनी अथवा भूजल सर्वेक्षण विकास यंत्रणेच्या अधिका-यांनी ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समितीला मागणीनुसार उपलब्ध करुन द्यावयाचे आहे.

(१४) कंत्राटदाराची बिले कामाच्या टप्प्यानुसार अदा करण्याचे अधिकार ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समितीला असतील. मात्र, त्यांची वेळोवेळी तपासणी करण्याचे अधिकार ग्रामस्तरावरील सामाजिक लेखा परिक्षण समितीस, महिला विकास समितीस व जिल्हा परिषदेच्या संबंधित यंत्रणेला असतील.

(१५) योजनेच्या बांधकामासाठी काही साधनसामुग्री बाहेरुन विकत घेवून कंत्राटदाराला पुरविण्याची आवश्यकता असल्यास त्यासाठी विहित कार्यपध्दतीचा अवलंब ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समिती करेल. अशा त-हेने साधनसामुग्री ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समितीने खरेदी करावी किंवा ती कंत्राटदारानीच खरेदी करुन घ्यावी याबाबतचा धोरणात्मक निर्णय ग्रामसभा ज्या वेळी टेंडरला अथवा कामास अंतिम मान्यता देईल त्याच वेळी घेईल. मात्र, त्यानंतर पुढील अंमलबजावणी ग्रामसभेने दिलेल्या अधिकारानुसार ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समितीने करावी. ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समितीने, ग्रामस्तरावरील सामाजिक लेखा परिक्षण समितीच्या निदेशानुसार कामाच्या कोणत्याही टप्प्यावर अहवाल ग्रामसभेस सादर करावा व ग्रामसभेच्या निर्णयानुसार पुढील कार्यवाही करावी.

(१६) साधन सामुग्री खरेदी करताना राज्य शासनाने अथवा जिल्हा परिषदेने याबाबत केलेले दर करार असल्यास त्यानुसार **व त्याच प्रतीची खरेदी करावी.** दर करारापेक्षाही कमी रक्कमेत व उच्च प्रतीचा माल उपलब्ध होवू शकतो अशी ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समितीची खात्री झाल्यास निविदा सूचना अथवा दरपत्रके मागवून जिल्हा परिषदेच्या संबंधित तांत्रिक तंज्ञाच्या मार्गदर्शनाने व ग्रामस्तरावरील सामाजिक लेखा परिक्षण समितीच्या अध्यक्षांच्या सहमतीने निर्णय घेण्यात यावा.

(१७) कार्यादेश देण्याच्या करारपत्रावर **ग्रामसभेने** मान्य केलेल्या **ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समितीचे पदाधिकारी** यांच्या सहया असतील.

(१८) योजनेचे काम सुरु असताना टप्प्यानुसार वेळोवेळी ग्राम पाणी पुरवठा स्वच्छता समितीने आवश्यकतेनुसार ग्राम सभा बोलावून कामाचा आढावा सादर करावा.

(१९) योजनेच्या अंमलबजावणीच्या काळात पर्यवेक्षणासाठी ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समिती त्यांच्या सदस्यांतून एक कायम उप गट नेमेल. तसेच ग्रामस्तरावरील सामाजिक लेखा परिक्षण समिती, महिला विकास समिती अथवा **महिला मंडळे** सुध्दा ग्रामस्थांच्या वतीने कामावर देखरेख करु शकतील.

(२०) जिल्हापरिषदेच्या व राज्य शासनाच्या तांत्रिक अधिका-यांना योजनेच्या कामकाजाची व खरेदी केलेल्या मालाची प्रत तपासणी करण्याचे पूर्ण अधिकार असतील. त्या अनुषंगाने आवश्यकतेनुसार ग्राम पंचायतीला अथवा ग्राम सभेला निदेश देण्याचेही जिल्हापरिषदेला व राज्य शासनाला अधिकार असतील.

(२१) पाणी पुरवठा योजनेच्या कामाच्या **पूर्णत्वाचा दाखला** ग्रामस्तरावरील सामाजिक लेखा परिक्षण समितीच्या अथवा महिला मंडळांच्या सहमतीनंतरच देण्यात येईल व कंत्राटदाराचे अंतिम देयक **ग्रामसभेने मान्यता दिल्यानंतरच** अदा करण्यात यावीत.

(२२) योजनेच्या खर्चाचे ग्रामस्तरावर ग्राम पंचायतीत स्वतंत्र हिशेब ठेवण्यात यावेत. त्याचे लेखा परिक्षण करण्याचे शासनास व जिल्हा परिषदेस अधिकार असतील. ग्रामसभेत हे हिशोब वेळोवेळी सादर केले जातील, शासनाच्या अधिका-यांना व जिल्हा परिषदेच्या अधिका-यांना हिशोब तपासण्याची मुभा असेल.

**(ड) योजनेची देखभाल व दुरुस्ती :-**

या कार्यक्रमांतर्गत घेण्यात आलेल्या योजना म्हणजे हातपंप व पारंपारीक स्त्रोतांचे पुनःरुज्जीवन यांची देखभाल व दुरुस्ती संबंधित लाभार्थी समूहाने /ग्राम पंचायतीने करावी.

**(इ) पिण्याच्या पाण्याच्या स्त्रोतांचे पुनरूज्जीवन :-**

ज्या गावामध्ये **हातपंप उभारणी** करण्याचे प्रस्तावित केले आहे त्याच गावामधील शक्यतो, परंतु आवश्यकतेनुसार, पिण्याच्या पाण्याच्या **पारंपारिक** स्त्रोतांचे पुनरुज्जीवन करण्याचा प्रकल्प हाती घेण्यात यावा. यामध्ये गावातील सार्वजनिक विहिर,बावडी इ.ची खोली वाढविणे, सार्वजनिक रुफटॉप रेन वॉटर हार्वेस्टिंग स्ट्रक्चर घेऊन या विहिरींचे पुर्नभरण करण्यासाठीचे स्ट्रक्चर तयार करणे इ.उपाय योजना घेण्यास अनुमती देण्यास हरकत नसावी. अर्थात हा निर्णय स्थानिक परिस्थितीनुरुप व गावाच्या मागणीनुसार जिल्हा मंजूरी समितीने घ्यावा. सदर उपाय योजनाही संबंधित ग्रामपंचायतीच्या ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समितीमार्फत वरील पध्दतीनेच राबविण्यात यावी.

**५. ग्रामीण भागातील प्राथमिक शाळांमध्ये पिण्याच्या पाण्याची सुविधा उपलब्ध करून देण्याची - उपाय योजना राबविण्यासाठी मार्गदर्शक सूचना :-**

(अ) **शाळा निवडीचे निकष व प्राथम्यक्रम :-**

(१) ग्रामीण भागातील जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळा
(i) मुलींची शाळा
(ii) अनुसूचित जाती / अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांची टक्केवारी अधिक असलेल्या शाळा.
(iii) एन.सी. / पी.सी. गावामधील /वाडीमधील शाळा.
(iv) इतर प्राथमिक शाळा

(२) संपूर्ण स्वच्छता अभियांनांतर्गत ज्या प्राथमिक शाळांना स्वच्छतेच्या सुविधा उपलब्ध करुन देण्यात येत आहेत, त्याच प्राथमिक शाळांना या योजने अंतर्गत पिण्याच्या पाण्याची सुविधा प्राथम्याने व प्राधान्याने उपलब्ध करुन देण्यात

यावी. म्हणजे, त्या प्राथमिक शाळेमध्ये स्वच्छतेच्या सुविधा व पिण्याच्या पाण्याची सुविधा एकाच वेळेस उपलब्ध होऊ शकेल. त्यानंतर इतर शाळांचा विचार करावा.

(ब) लोकसहभाग :-

ही योजना सुध्दा लोकसहभागामधून राबवावयाची असल्याने, शालेय पाणी पुरवठा **योजनेच्या भांडवली खर्चाच्या १० % भाग संबंधित योजनेच्या लाभार्थ्यांनी ( संबंधित संस्थेने अथवा पालक- शिक्षक संघटनेने ) उचलणे आवश्यक आहे.** अनुसूचित जाती /अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांची संख्या ५०% पेक्षा अधिक असेल तर, **लोकसहभागाची रक्कम ५% राहील.** संबंधित शिक्षणसंस्था, पालक- शिक्षक संघटना जर ही लोकसहभागाची रक्कम पूर्णत: भरू शकत नसतील तर, लोकसहभागाची रक्कम संबंधित ग्राम पंचायतीने स्वत:च्या उत्पन्नातून भरावी. संबंधित ग्राम पंचायतीचीही आर्थिक स्थिती तूर्त चांगली नसल्यास, लोकसहभागाची ही रक्कम मा. खासदार अथवा आमदार यांच्या स्थानिक विकास निधीमधून भरण्यास या योजनेपुरती हरकत नाही.

(क) कार्यक्रम राबविण्यासाठी मार्गदर्शक सूचना :-

(१) या योजनेअंतर्गत प्राथमिक शाळेसाठी पिण्याच्या पाण्याची सुविधा, गावातील / वाडीतील अस्तित्वात असलेल्या नळपाणी पुरवठा योजनेतून (योजनेचा विस्तार करून) पाईपलाईन टाकून उपलब्ध करून देता येईल अथवा नविन विंधण विहिर घेऊन उपलब्ध करून देता येईल.

(२) ज्या जिल्ह्यांमध्ये संपूर्ण स्वच्छता अभियानाअंतर्गत शालेय शौचालयाची कामे घेण्यात आली आहेत त्या शाळांमध्ये प्राधान्याने शालेय पाणी पुरवठा योजना / सुविधा पुरवठ्याचे नियोजन करावे.

(३) ज्या शाळांमध्ये संपूर्ण स्वच्छता अभियान कार्यक्रम राबविण्यात येणार आहे. त्याच शाळांमध्ये पाणी पुरवठयाची सोय शक्यतोवर उपलब्ध व्हावी असे धोरण असल्याने जिल्हा परिषदेमध्ये मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे अध्यक्षतेखाली संपूर्ण स्वच्छता अभियान कार्यक्रम राबविण्यासाठी जी कार्यकारी समिती शासन निर्णय, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग क्र.संस्वअ १००२/ प्रक्र-१२७/ पापु-१६, दिनांक ६ डिसेंबर, २००२ अन्वये गठीत करण्यात आली आहे त्या समितीमार्फत हया शालेय पाणी पुरवठा योजना मंजूर करणे व निधी वाटप करण्याचे सर्व अधिकार देण्यात येत आहेत.

(४) **ज्या जिल्हयांमध्ये संपूर्ण स्वच्छता अभियान राबविण्यात येत नाही तेथे,** शासन निर्णय, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग क्रमांक संस्वअ १००२/प्रक्र१२७/ पापु-१६, दिनांक ६ डिसेंबर, २००२ मध्ये नमूद केल्यानुसार समिती गठित करून त्या समिती मार्फत शालेय पाणी पुरवठयाचा कार्यक्रम राबविण्यात यावा. या समितीस, शालेय पाणी पुरवठा योजना मंजूर करणे व निधी वाटप करण्याचे सर्व अधिकार देण्यात येत आहेत. **जिल्हास्तरावर या कार्यक्रमाच्या अंमलबजावणीसाठी स्वतंत्र बँक खाते उघडण्यात यावे.**

(५) शाळांमधील पाणी पुरवठा योजनेची अंमलबजावणी जिल्हा परिषदेतील मंजूरी समितीने ठरविल्यानुसार जिल्हा परिषदेमार्फत, ग्राम पंचायती मार्फत, शाळेच्या मागणीनुसार स्वत: शाळा करु शकेल. शक्यतो, संपूर्ण स्वच्छता अभियानाअंतर्गत शालेय शौचालय बांधकामाची अंमलबजावणी ज्या पध्दतीने होते त्याच पध्दतीने शालेय पाणी पुरवठा योजनांची अंमलबजावणी करावी. मात्र, याबाबतचा अंतिम निर्णय स्थनिक परिस्थितीनुसार जिल्हास्तरीय मंजूरी समितीने घ्यावा.

(ड) योजनेची देखभाल व दुरूस्ती :-

शाळेसाठी करण्यात आलेल्या पाणी पुरवठा योजनेची देखभाल व दुरुस्ती संबंधित ग्राम पंचायतीने/ पालक-शिक्षक संघटनेने /शाळेने करावी.

६. या योजनांसाठी केंद्र शासनाकडून मिळणा-या निधीपैकी विंधणविहीर व पारंपारिक स्त्रोतांचे पुनरुज्जीवन या साठीचा निधी **शिवकालीन पाणी साठवण योजनेखाली जिल्हा परिषद स्तरावर उघडलेल्या स्वतंत्र बँक खात्यात** तर, शालेय पाणी पुरवठा योजनांसाठीचा निधी, **जिल्हा परिषद स्तरावर उघडलेल्या संपूर्ण स्वच्छता अभियानाच्या अथवा स्वतंत्र उघडलेल्या**

**खात्यात जमा करण्यात यावा. मात्र, त्याचे हिशोब स्वतंत्ररित्या ठेवावेत व उपयोगिता प्रमाणपत्रही शासनास स्वतंत्रपणे सादर करावे.**

७. या योजनेच्या भौतिक व आर्थिक प्रगती बाबतचा अहवाल केंद्र शासनाकडे सादर करण्यासाठी दरमहा या विभागाकडे पाठविण्यात यावा.

८. जिल्हास्तरावरील प्रसिध्दी माध्यमांव्दारे या योजनांची प्रचार प्रसिध्दी करण्यात यावी.

**महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,**

(सुधीर ठाकरे)
**उप सचिव, महाराष्ट्र शासन.**

प्रत,

१. मा.राज्यपाल यांचे सचिव
२. मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
३. मा.उपमुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
४. मा.मंत्री (सर्व) यांचे खाजगी सचिव
५. मा.राज्यमंत्री (सर्व) यांचे खाजगी सचिव
६. मा.अध्यक्ष,जिल्हा परिषद (सर्व)
७. मुख्य सचिव,महाराष्ट्र शासन,मुंबई
८. विभागीय आयुक्त (सर्व)
९. सदस्य सचिव,महाराष्ट्र जीवन प्राधिकरण,मुंबई
१०. संचालक,भूजल सर्वेक्षण विकास यंत्रणा,पुणे
११. महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय, मुंबई
१२. जिल्हाधिकारी (सर्व)
१३. मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद (सर्व)
१४. मुख्य लेखा व वित्त अधिकारी,जिल्हा परिषद (सर्व)
१५. प्रादेशिक मुख्य अभियंता,महाराष्ट्र जीवन प्राधिकरण (सर्व)
१६. उपसंचालक, भूजल सर्वेक्षण विकास यंत्रणा (सर्व)
१७. अधिक्षक अभियंता,महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, (सर्व)
१८. तहसीलदार (सर्व)
१९. जिल्हा वरिष्ठ भूवैज्ञानिक, भूजल सर्वेक्षण विकास यंत्रणा (सर्व)
२०. जिल्हा माहिती अधिकारी (सर्व)
२१. कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण (सर्व)
२२. कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग,जिल्हा परिषद (सर्व)
२३. उप अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा उपविभाग,जिल्हा परिषद (सर्व)
२४. उप अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा यांत्रिकी उपविभाग,जिल्हा परिषद (सर्व)
२५. गट विकास अधिकारी,पंचायत समिती (सर्व)
२६. महालेखापाल, महाराष्ट्र-१ (लेखा परिक्षा)/(लेखा व अनुज्ञेयता), मुंबई.
२७. महालेखापाल, महाराष्ट्र-२ (लेखा परिक्षा)/(लेखा व अनुज्ञेयता), नागपूर.
२८. मुख्य लेखा परिक्षक,स्थानिक निधी लेखा,नवी मुंबई.
२९. उप मुख्य लेखा परिक्षक, स्थानिक निधी लेखा, नाशिक, पुणे, औरंगाबाद, अमरावती व नागपूर.
३०. नियोजन विभाग,मंत्रालय, मुंबई
३१. वित्त विभाग,मंत्रालय, मुंबई.
३२. ग्राम विकास व जलसंधारण विभाग,मंत्रालय,मुंबई.
३३. मंत्रालयातील इतर सर्व विभाग
३४. पाणी पुरवठा व स्वच्छता विभागातील सर्व पर्यवेक्षकीय अधिकारी व कार्यासने.
३५. निवडनस्ती (पापु-०७), पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग

## विवरणपत्र

## जिल्हा परिषदांना ठरवून दिलेले उद्दीष्ट

| अ.क्र. | जिल्हा परिषदेचे नाव | हातपंप उभारणी | | | पिण्याच्या पाण्याच्या पारंपारिक स्त्रोताचे पुनरुज्जीवन | | | प्राथमिक शाळेसाठी पिण्याच्या पाण्याची सुविधा उपलब्ध करुन देणे | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | ०३-०४ | ०४-०५ | एकूण | ०३-०४ | ०४-०५ | एकूण | ०३-०४ | ०४-०५ | एकूण |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ |
| १ | ठाणे | ५३ | ५३ | १०६ | ५३ | ५३ | १०६ | २६ | २५ | ५१ |
| २ | रायगड | ५३ | ५३ | १०६ | ५३ | ५३ | १०६ | ३० | ७० | १०० |
| ३ | रत्नागिरी | ५३ | ५३ | १०६ | ५३ | ५३ | १०६ | ८० | ७० | १५० |
| ४ | सिंधुदुर्ग | ५८ | ५७ | ११५ | ५८ | ५७ | ११५ | ८० | ७० | १५० |
| ५ | नाशिक | १७५ | १७५ | ३५० | १७५ | १७५ | ३५० | २६ | २५ | ५१ |
| ६ | धुळे | ५३ | ५३ | १०६ | ५३ | ५३ | १०६ | ३० | ७० | १०० |
| ७ | नंदूरबार | ५३ | ५३ | १०६ | ५३ | ५३ | १०६ | ७० | ७० | १४० |
| ८ | जळगाव | ५३ | ५३ | १०६ | ५३ | ५३ | १०६ | ७० | ७० | १४० |
| ९ | अहमदनगर | १७५ | १७५ | ३५० | १७५ | १७५ | ३५० | ८० | ७० | १५० |
| १० | पुणे | १७५ | १७५ | ३५० | १७५ | १७५ | ३५० | ८० | ७० | १५० |
| ११ | सातारा | १७५ | १७५ | ३५० | १७५ | १७५ | ३५० | ७० | ७० | १४० |
| १२ | सांगली | १७५ | १७५ | ३५० | १७५ | १७५ | ३५० | ७० | ७० | १४० |
| १३ | सोलापूर | १७५ | १७५ | ३५० | १७५ | १७५ | ३५० | ७० | ७० | १४० |
| १४ | कोल्हापूर | ५३ | ५३ | १०६ | ५३ | ५३ | १०६ | १२० | ८० | २०० |
| १५ | औरंगाबाद | १७५ | १७५ | ३५० | १७५ | १७५ | ३५० | ७० | ७० | १४० |
| १६ | जालना | ५३ | ५३ | १०६ | ५३ | ५३ | १०६ | ७० | ७० | १४० |
| १७ | परभणी | ५३ | ५३ | १०६ | ५३ | ५३ | १०६ | २५ | २६ | ५१ |
| १८ | हिंगोली | ५३ | ५३ | १०६ | ५३ | ५३ | १०६ | २६ | २५ | ५१ |
| १९ | बीड | १७५ | १७५ | ३५० | १७५ | १७५ | ३५० | ७० | ७० | १४० |
| २० | नांदेड | ५३ | ५३ | १०६ | ५३ | ५३ | १०६ | ३० | ७० | १०० |
| २१ | उस्मानाबाद | १७५ | १७५ | ३५० | १७५ | १७५ | ३५० | ७० | ७० | १४० |
| २२ | लातूर | १७५ | १७५ | ३५० | १७५ | १७५ | ३५० | २५ | २६ | ५१ |
| २३ | बुलढाणा | ५२ | ५२ | १०४ | ५२ | ५२ | १०४ | ७० | ७० | १४० |
| २४ | अकोला | ५२ | ५२ | १०४ | ५२ | ५२ | १०४ | ७० | ७० | १४० |
| २५ | वाशिम | ५२ | ५२ | १०४ | ५२ | ५२ | १०४ | २६ | २५ | ५१ |
| २६ | अमरावती | ५२ | ५२ | १०४ | ५२ | ५२ | १०४ | ३० | ७० | १०० |
| २७ | यवतमाळ | ५२ | ५२ | १०४ | ५२ | ५२ | १०४ | ७० | ७० | १४० |
| २८ | वर्धा | ५२ | ५२ | १०४ | ५२ | ५२ | १०४ | २५ | २६ | ५१ |
| २९ | नागपूर | ५२ | ५२ | १०४ | ५२ | ५२ | १०४ | १२० | ८० | २०० |
| ३० | भंडारा | ५२ | ५२ | १०४ | ५२ | ५२ | १०४ | २६ | २५ | ५१ |
| ३१ | गोंदिया | ५२ | ५२ | १०४ | ५२ | ५२ | १०४ | २५ | २६ | ५१ |
| ३२ | चंद्रपूर | ५२ | ५२ | १०४ | ५२ | ५२ | १०४ | ९० | ५० | १४० |
| ३३ | गडचिरोली | ५२ | ५२ | १०४ | ५२ | ५२ | १०४ | २५ | २६ | ५१ |
| | एकुण | २९६३ | २९६२ | ५९२५ | २९६३ | २९६२ | ५९२५ | १८६५ | १८६५ | ३७३० |

-------